लोकमत

# आर्थिक संतृप्तीकरण अभियान अंतर्गत री-केवायसी शिबिर



धनादेश प्रदान करताना सचिन शेंडे, जयप्रकाश नारायण, अंजना श्यामनाथ, राजू नंदनवार.

लोकमत न्यूज नेटवर्क

**भंडारा :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राजाराम लॉन, तुमसर येथे ग्रामपंचायत स्तरावरील आर्थिक समावेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ग्रामीण नागरिकांना री-केवायसीचे महत्त्व पटवून देत विविध सामाजिक सुरक्षा योजनांची माहिती देण्यात आली.

याप्रसंगी रिझर्व्ह बँकेचे क्षेत्रीय निदेशक सचिन शेंडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी नागरिकांशी संवाद साधत जनधन योजना, अटल पेन्शन योजना तसेच विविध सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच आगामी काळातील तंत्रज्ञानातील बदल लक्षात घेऊन कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग यांसारख्या नवनवीन तंत्रज्ञानाचे शिक्षण घेण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे आभार अग्रणी बँक जिल्हा व्यवस्थापक राजू नंदनवार यांनी मानले. वरिष्ठ शाखा व्यवस्थापक घनश्याम पटले यांनी सहकार्य केले.

## कर्ज मंजुरी पत्रे व धनादेशाचे वितरण

रिझर्व्ह बँकेच्या उपमहाव्यवस्थापक अंजना श्यामनाथ यांनी वेळेत री-केवायसी पूर्ण करण्याचे महत्त्व स्पष्ट केले, तर बँक ऑफ इंडियाचे आंचलिक प्रबंधक जय नारायण यांनी सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेण्यावर भर दिला. शिबिरात विविध बचत गटांना कर्जमंजुरीपत्रे तसेच लाभार्थ्यांना धनादेशांचे वितरण करण्यात आले.

## पथनाट्यातून जनजागृती व सेवा केंद्रांचे स्टॉल

पथनाट्याच्या माध्यमातून जनधन योजना, सुरक्षा विमा योजना, जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना आणि डिजिटल फसवणूक याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच उमेद अभियान, महिला आर्थिक विकास महामंडळ, शहरी उपजीविका अभियान यांसह ग्राहक सेवा केंद्रांचे स्टॉल्सही उभारण्यात आले होते.